प्रेस नोट दिनांक:- २६/०८/२०२३

**मेघवाडी पोलीस ठाणेकडून ६० ग्रॅम एम.डी (मेफेड्रॉन) किंमत अंदाजे ६००००००/- रुपये किंमतीचा अंमलीपदार्थ जप्त करुन एका आरोपीस अटक केलेबाबत.**

दिनांक २५/०८/२०२३ रोजी मेघवाडी पोलीसांना त्यांचे खास बातमीदाराकडून माहिती मिळाली की, 'एक इसम हा निळया रंगाच्या सुझुकी ॲक्सेस मोपेड स्कुटरवरुन पिंपळेश्वर मंदिर रिक्षा पार्किंग जवळ शामनगर, जोगेश्वरी पुर्व, मुंबई या ठिकाणी त्याचे ताब्यातील **एम.डी. (मेफेड्रॉन)** हा अंमलीपदार्थ त्याच्या गिऱ्हाईकांना विकण्यासाठी येणार आहे'.

मिळालेल्या उपरोक्त खबरीच्या अनुषंगाने मेघवाडी पोलीस ठाण्याचे सपोनि भगत, पोउनि भोसले व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी शहानिशा करुन दोन लायक पंचांसह घटनास्थळी सापळा लावला असता, दिनांक २६/०८/२०२३ रोजी ०१.२० ते ०२.४० वा. पर्यंत एका निळया रंगाच्या सुझुकी ॲक्सेस मोपेड स्कुटरवरुन आलेला एक इसम हा त्याचे स्वत:च्या कब्जात ६० ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमलीपदार्थ किंमत अंदाजे ६,००,०००/- रु. बाळगताना आढळून आला.

सदर इसमास पंचांसमक्ष त्याचे कब्जातील अंमलीपदार्थासह ताब्यात घेतले असून त्याचे विरुध्द मेघवाडी पोलीस ठाणे गु.र.क्र. ३०१/२३, कलम ८ (क) सह कलम २२ एन.डी.पी.एस. कायदा अन्वये कारवाई करुन अटक करण्यात आले आहे.

**आरोपीकडून हस्तगत मुद्देमालाचे वर्णन**

**६० ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमलीपदार्थ किंमत अंदाजे ६,००,०००/- रुपये.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त, का.व सु. श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.परमजितसिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १०, श्री. दत्ता नलावडे, मा.सहायक पोलीस आयुक्त, मेघवाडी विभाग, डॉ. अविनाश पालवे, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मांढरे यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली सपोनि आनंद भगत, पोउनि मनोज भोसले, पोहक्र.०१०३६/राजेश ठाकूर, पोशिक्र.०८०३२८/ जमीर शेख, पोशिक्र.१११३७/विजय पाटील, पोशिक्र.१११९७७/इंद्रजीत सुरवसे, पोशिक्र.११०८२८/नरेश वरठा यांनी पार पाडली.